प्रकरण चार

आरोग्य विभाग (परिच्छेद क्रमांक 4.464 ते 4.483)

4.464 प्राथमिक आरोग्य केंद्र मोरोशी अंतर्गत सावर्णे, मोरोशी, व धारखिंड येथे वापरण्यात आलेल्या गाडी भाडे देयकाबाबत.

पंचायत समिती मुरबाड, जिल्हा ठाणे, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 9)

पंचायत समिती मुरबाडच्या सन 2021-22 च्या लेखापरीक्षणात शासकीय निधीतील प्रमाणके तपासली असता प्राथमिक आरोग्य केंद्र मोरोशी अंतर्गत सावर्णे, मोरोशी, व धारखिंड येथे वापरण्यात आलेल्या गाडीच्या भाड्याची देयके एकूण रक्कम रुपये 4,80,570/- अदा केली आहेत त्यात आढळून आलेल्या अनियमिततांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय दिनांक 07/10/2017 नुसार सदर वाहन सेवा पुरविणे या योजनेस घेण्यात आलेली प्रशासकीय मान्यता आदेश उपलब्ध झाले नाहीत तसेच सदर मक्त्याच्या अनुषंगाने आरोग्य विभाग व महाराष्ट्र विकास ग्रुप कंपनी यांच्यामध्ये झालेला करारनामा उपलब्ध झाला नाही त्यामुळे मक्तेदाराने प्रशासकीय मान्यता आदेशातील व करारनाम्यातील सर्व अटीची पूर्तता केल्याची पडताळणी करता आली नाही.

2. आरोग्य विभागाने महाराष्ट्र विकास ग्रुप कंपनी यांना दिलेला कार्यारंभ आदेश उपलब्ध झाला नाही त्यामुळे अदा केलेली रक्कम व कालावधी अचूक असल्याची पडताळणी करता आली नाही.

3. परिच्छेदाच्या तपशिलात नमूद केल्याप्रमाणे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र सावर्णे कडील गाडी क्रमांक MH-46-Z-6466, मोरोशी आरोग्य केंद्राकडील गाडी क्रमांक MH-05-CT-0295 व भरारी पथक धारखिंड कडील गाडी क्रमांक MH-05-BL-1476 या गाड्यांची मूळ लॉगबुक उपलब्ध झाली नाहीत.

4. महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक 01/10/2018 नुसार सदर वाहन सेवा पुरवठ्याची संविदा मूल्य हे रुपये 2,50,000/- पेक्षा जास्त असल्याने देयक अदा करतेवेळी 2 टक्के GST चा TDS वजा केला नाही.

4.465 प्राथमिक आरोग्य केंद्र वहाळ येथील वेतन देयकात जादा वेतन आहरित करून केलेल्या अपहाराबाबत.

पंचायत समिती चिपळूण, जिल्हा रत्नागिरी, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 18)

पंचायत समिती चिपळूण यांच्याकडील सन 2021-22 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणवेळी आरोग्य विभागाच्या अधिनस्त प्राथमिक आरोग्य केंद्र वहाळ यांच्या लेख्यांची तपासणी केली असता आढळून आलेल्या अनियमिततांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक सेवार्थ-2014/प्र.क्र.39/वित्त-5, दिनांक 15.09.2015 अन्वये विभागाच्या नियंत्रणाखालील जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांची वेतन व भत्त्यांची देयके पंचायत राज सेवार्थ प्रणालीद्वारे तयार करण्याबाबत सूचना पारित केल्या असून सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 5.7 अन्वये तालुका स्तरावरील लेव्हल 1 च्या अधिकाऱ्यांनी दरमहा त्यांची देयके लेव्हल 2 यांच्याकडे मंजुरीसाठी सादर करणे आवश्यक आहे व तद्नंतर लगेचच त्याबाबतची हार्ड कॉपी तपासणीसाठी पंचायत समिती स्तरावरील वित्त विभागास सादर करणेबाबत तरतूद आहे. त्यानुसार वित्त विभागाने सदरील देयकांची तपासणी करुन काही आक्षेप निदर्शनास आल्यास आवश्यकतेप्रमाणे पुढील महिन्याच्या देयकातून जादा प्रदाने/वसुली करण्याबाबत लेव्हल 1 च्या अधिकारी यांना कळविण्यात यावे अशी तरतूद आहे. त्यानुषंगाने याबाबत लेखापरीक्षणा दरम्यान खात्री केली असता प्राथमिक आरोग्य केंद्र वहाळ यांचेकडील सेवार्थ वेतन प्रणालीबाबत अशी कार्यवाही केली जात नाही. तसेच संबंधित आरोग्य केंद्रातील वेतन देयकांची प्रिंट काढली जात नाही. त्यानुषंगाने वेतन देयकांची तपासणी होत नाही.

2. प्राथमिक आरोग्य केंद्र वहाळ यांचेकडे सन 2021-22 या वित्तीय वर्षाच्या वेतन देयकाच्या प्रती अभिलेख स्वरुपात न ठेवल्याने लेखापरीक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत. तथापि मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी यांच्या तपासणी पथकाने तपासणीसाठी सन 2021-22 या वित्तीय वर्षामध्ये कोषागारात खर्च पडलेल्या अंतिम वेतन देयकाच्या सेवार्थ प्रणालीवरुन प्राप्त केलेल्या प्रती लेखापरीक्षणास उपलब्ध करून

देण्यात आल्या आहेत. त्यामुळे सदरील देयकावर वैदकीय अधिकारी अथवा कार्यालयातील इतर कोणत्याही कर्मचारी यांची स्वाक्षरी नाही. त्यानुसार लेव्हल-1 च्या स्तरावर संबंधित कर्मचारी याने वेतन देयक तयार केल्यानंतर सदर वेतन देयकांची तपासणी न करताच सर्व वेतन देयके लेव्हल 2 च्या अधिकारी यांचेकडे मंजुरीसाठी सादर केली जात असल्याचे दिसून येते. सदर बाब ही गंभीर आहे.

3. उपरोक्त प्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्र वहाळ यांचेकडील सन 2021-22 या आर्थिक वर्षातील वेतन देयकांची तपासणी केली असता संबंधित आरोग्य केंद्राकडील कनिष्ठ सहाय्यक श्री. दुष्यंत शहाजी तिरमारे यांनी आपले स्वत:चे वेतन देयकात मूळ वेतन फरक या उप लेखाशीर्षाखाली अतिरिक्त रक्कम नोंद करुन एकूण रुपये 60,23,581/- इतकी जादाची वेतन रक्कम सन 2021-22 मध्ये आहरित करुन अपहार केल्याचे दिसून येते.

4. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 49 व 57 नुसार रोजकीर्दमध्ये सर्व नोंदी विहित वेळेत पूर्ण करणे, दैनिक गोषवारा काढणे, मासिक गोषवारा काढणे, तसेच वार्षिक बँक ताळमेळ घेवून बँक शिल्लक रक्कम व रोजकीर्द शिल्लक रक्कम यामधील तफावतीचे विवरणपत्र तयार करणे आवश्यक आहे. तसेच सदर बाबीची कार्यालय प्रमुख यांनी खात्री करुन स्वाक्षरी करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

5. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-10.02/प्र.क्र.128/अर्थोपाय, दिनांक 06/06/2008 अन्वये अखर्चित निधी शासन खाती परत जमा करणे आवश्यक आहे. सदर शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे वेतन व भत्याची अखर्चित रक्कम आर्थिक वर्ष संपताच शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे. तथापि याबाबत कार्यवाही झालेली नाही. तसेच आरोग्य केंद्राकडील संबंधित कॅशबुकमध्ये शासन वजावटीच्या व इतर अशासकीय वजावटीच्या रकमा उदाहरणार्थ आयकर, LIC, सोसायटी व सेवा शुल्क जमा होत असते त्यानुषंगाने सदर रक्कम जमा झाल्यानंतर तात्काळ संबंधित खाती भरणा करणे आवश्यक असताना प्राथमिक आरोग्य केंद्र वहाळकडील कॅशबुक तपासणी केली असता सदर खात्यावर दिनांक 31/03/2022 अन्वये रुपये 2,00,705/- इतकी रक्कम शिल्लक असून सदर रक्कम कोणत्या लेखाशीर्षाखाली व कधीपासून शिल्लक आहे याबाबत खात्री होत नाही.

6. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता मधील नमुना नंबर 1 धनादेश साठा नोंदवही, नमुना नंबर 11 धनादेश नोंदवही, नमुना नंबर 12 बिल नोंदवही, नमुना नंबर 13 अनुदान नोंदवही, नमुना नंबर 14 खर्च नोंदवही, नमुना नंबर 30 सादिल खर्च नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध केली नाही.

4.466 प्राथमिक आरोग्य केंद्रांकडील सेवार्थ प्रणाली वेतन देयके व रोखवहीतील अनियमितता.

पंचायत समिती त्र्यंबकेश्वर, जिल्हा नाशिक सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 10)

पंचायत समिती त्र्यंबकेश्वर चे सन 2021-22 प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या लेख्यांची तपासणी केली असता सेवार्थ वेतन प्रणालीतील वेतन देयके व रोखवहीतील अनियमिततेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. पंचायत समिती त्र्यंबकेश्वरचे सन 2021-22 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात आरोग्य विभागाच्या अधिनस्त प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या लेख्यांची तपासणी केली असता ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक सेवार्थ-2014/प्र.क्र.39/ वित्त-5 दिनांक 15.09.2015 अन्वये ग्रामविकास 7 विभागाच्या नियंत्रणाखालील जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांची वेतन व भत्यांची देयके पंचायत राज सेवार्थ प्रणालीद्वारे तयार करण्याबाबत सूचना पारीत केल्या असून सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 5.7 अन्वये तालुका स्तरावरील लेव्हल 1 चे अधिकारी त्यांची देयके लेव्हल 2 यांच्याकडे सादर करून तद्नंतर लगेचच हार्ड कॉपी तपासणीसाठी पंचायत समिती स्तरावरील वित्त विभागास सादर करणे आवश्यक आहे. वित्त विभागाने सदर देयकांची तपासणी करून काही आक्षेप निदर्शनास आल्यास आवश्यकतेप्रमाणे पुढील देयकातून प्रदाने/वसूल करण्याबाबत लेव्हल 1 च्या अधिकाऱ्यांना कळविण्याबाबत तरतूद असताना प्राथमिक आरोग्य केंद्र व पंचायत समिती स्तरावरील वित्त विभाग यांनी तरतुदीनुसार कार्यवाही केली नाही.

2. प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत कार्यरत असणारे कर्मचारी यांच्या सेवार्थ वेतन प्रणालीतील वेतन रकमेतून जिल्हा सोसायटी कर्ज हप्ता, कर्मचारी बँक कपात, एल.आय.सी. वर्गणी, सेवाशुल्क, आयकर इत्यादी प्रकारच्या अशासकीय वजावटीच्या रक्कमा वजावट करून संबंधित केंद्रांकडील रोखवही मध्ये जमा होत असतात व अशी रक्कम तात्काळ त्या त्या विभागाकडे संबंधित कर्मचारी यांचे नावे भरणा करणे अपेक्षित असते. तथापि, प्राथमिक आरोग्य केंद्रांकडून सदर रक्कम तात्काळ संबंधित विभागाकडे जमा केली जात नाही.

3. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 49 व 57 नुसार रोजकीर्द मध्ये सर्व नोंदी विहित वेळेत पूर्ण करणे, दैनिक गोषवारा काढणे, मासिक गोषवारा काढणे, तसेच बँक ताळमेळ घेऊन बँक शिल्लक रक्कम व रोजकीर्द शिल्लक रक्कम यामधील तफावतीचे विवरणपत्र तयार करणे आवश्यक आहे. तथापि, प्राथमिक आरोग्य केंद्र आंबोली, प्राथमिक आरोग्य केंद्र ठाणापाडा, प्राथमिक आरोग्य केंद्र रोहिले व प्राथमिक आरोग्य केंद्र चिंचओहोळ यांनी तशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे कोणत्या बाबींची रक्कम प्राथमिक आरोग्य केंद्रांकडे शिल्लक आहे याचा ताळमेळ घेतला नाही.

4. दिनांक 31 मार्च 2022 अखेर प्राथमिक आरोग्य केंद्र आंबोली रुपये 4,22,796/-, ठाणापाडा रुपये 5,88,489/-, रोहिले रक्कम रुपये 14,712/-, चिंचओहोळ रक्कम रुपये 2,64,878/- याप्रमाणे रोखवहीमध्ये रक्कम शिल्लक असल्याचे दिसून येते. सदरची रक्कम कशाची शिल्लक आहे याबाबतचा आढावा घेऊन संबंधित लेखाशीर्षाखाली भरणा करणे आवश्यक आहे.

4.467 प्राथमिक आरोग्य केंद्राकडील कंत्राटी वाहन चालक वेतन देयकातील अनियमितता.

पंचायत समिती श्रीगोंदा, जिल्हा अहिल्यानगर, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 21)

पंचायत समिती श्रीगोंदा सन 2021-2022 चे लेखापरीक्षणात प्राथमिक आरोग्य केंद्राकडील कंत्राटी वाहन चालक वेतन देयकामध्ये आढळलेल्या अनियमिततांबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-2019/प्र.क्र.13/कामगार-8 दिनांक 22.02.2019 च्या परिपत्रकानुसार, कंत्राटदाराने एकत्रित देयक, कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे व वैधानिक देण्याचे तपशील, उपस्थिती अहवाल, भविष्य निर्वाह निधी (EPF), राज्य कामगार विमा योजना/कर्मचारी नुकसान भरपाई, व्यवसाय कर भरणा पावत्या, आणि एकत्रित वेतन चिठ्ठ्या यांसारखी आवश्यक कागदपत्रे जोडून देयक सादर करणे बंधनकारक असताना पंचायत समितीने अपूर्ण देयके स्वीकारून संबंधित कंत्राटदाराला एकूण रक्कम रुपये 9,40,630/- नियमबाह्य प्रदान केले आहे.

2. जिल्हा परिषद आदेश क्रमांक आरोग्य/वाहन/375/2021 दिनांक 15.06.2021 नुसार दिलेल्या पुरवठा आदेशातील अटी व शर्तीचे पालन झाले नाही तसेच कंत्राटी वाहनचालकांना किमान वेतन कायद्यानुसार मासिक पारिश्रमिक अदा केले बाबत तपशील उपलब्ध झाला नाही. रुग्णवाहिका व इतर वाहनांचे लॉगबुक आणि हिस्ट्रीबुक नियमितपणे भरण्याची व त्यावर संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी घेण्याची अट असताना, त्यानुसार लॉगबुक सादर केले नाही. मासिक पारिश्रमिक मिळाल्याची पोहोच व EPF भरणा केलेबाबतचे प्रमाणपत्र सादर केले नाही याव्यतिरिक्त, कंत्राटी वाहनचालकांचे इन्शुरन्स प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय पहिले देयक अदा करू नये अशी अट असताना पंचायत समितीने त्या पूर्वी देयक अदा केले आहे.

3. पंचायत समितीने देयकांतून 2 टक्के आयकर (TDS) रुपये 18,813/- कपात केला नाही तसेच वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण 2018/प्र.क्र.144/2018/कोषा प्रशा-5 दिनांक 28 सप्टेंबर, 2018 नुसार 2 टक्के वस्तू व सेवा कर (GST) रक्कम रुपये 18,813/- कपात केली नाही. सदर रकमा वसूल करणे आवश्यक आहे.

4.468 प्राथमिक आरोग्य केंद्राकडील कंत्राटी वालनचालक वेतन देयकातील अनियमितता.

पंचायत समिती श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 3)

पंचायत समिती श्रीरामपूर सन 2021-22 चे लेखापरीक्षणामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राकडील कंत्राटी वाहन चालकांना अदा केलेल्या वेतन देयकात आढळलेल्या अनियमिततांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. पुरवठादारास प्रदान केलेल्या एकूण रक्कम रुपये 9,31,846/- मधून 2 टक्के आयकर (TDS) रुपये 18,637/- आणि 2 टक्के वस्तू व सेवा कर (TDS) रुपये 18,637/- कपात न केल्याने रुपये 37,274/- झालेले जादा प्रदान वसूल करणे आवश्यक आहे.

2. जिल्हा परिषद आदेश क्रमांक आरोग्य/वाहन/375/2021 दिनांक 15.06.2021 मधील अटींचे उल्लंघन झाले आहे त्यानुसार संस्थेने कंत्राटी वाहनचालकांना अदा केलेल्या मासिक पारिश्रमिक रकमांचा तपशील सादर केला नाही.

3. जिल्हा परिषद आदेश अट क्रमांक 8(8) पोहोच व प्रमाणपत्र सादर केलेले नसताना नियमित मासिक वेतन अदा केले आहे. अट क्रमांक 8(9) नुसार कंत्राटी वाहनचालकांना मासिक वेतन मिळाल्याची पोहोच आणि EPF (कर्मचारी भविष्य निर्वाह निधी) भरणा केल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच पुढील महिन्याचे वेतन अदा करण्याचे आदेश असताना, प्रमाणपत्र सादर केलेले नसताना नियमित मासिक वेतन अदा केले आहे. तसेच कंत्राटी वाहनचालकांचे इन्शुरन्स प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच प्रथम देयक अदा करणे आवश्यक असताना, पंचायत समितीने इन्शुरन्स प्रमाणपत्र प्राप्त करून न घेताच प्रथम देयक अदा केले आहे.

4.469 आरोग्य शिबिरासाठी केलेल्या खर्चाबाबत.

पंचायत समिती कवठेमहांकाळ, जिल्हा सांगली सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 35)

पंचायत समिती कवठेमहांकाळ यांनी सन 2021-22 मध्ये लोकनेते आर.आर.पाटील (आबा) स्मृती आरोग्य कार्यकमांतर्गत सर्व रोग निदान आरोग्य शिबिरावर रक्कम रुपये 2,00,000/- खर्च केला असून सदर खर्चामधील अनियमिततेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. सदर खर्चाची प्रशासकीय व तांत्रिक मान्यता नस्तीसोबत नाही.

2. गौरव सर्जिकल मधून मेडिसिनसाठी कोटेशन मागवून रक्कम रुपये 29,234/- खर्च केला आहे.

3. शिबिरासाठी मंडप, डॉल्बी साउंड व मंडप डेकोरेशन, साहित्य, गाडी भाडे, साठी रुपये 66,970/- खर्च केला आहे. सदर खर्च जी.एस.टी. बिलाशिवाय व दरपत्रकाशिवाय केला आहे.

4. जिल्हा परिषद मुद्रणालय, सांगली यांचेकडून कोटेशनवर रक्कम रुपये 5,824/- पत्रिका छपाई केली आहे. श्री पुजारी केटरर्स शिबीरासाठी शाकाहारी जेवण साठी रुपये 51,900/- हा खर्च दरपत्रकाशिवाय केला आहे.

5. बेकर्स अँड जनरल स्टोअर्स, रांजणी कडून स्टेशनरी खरेदी केल्याचे नोंद आहे. परंतु रक्कम रुपये 2,880/- सोहम जनरल यांना अदा केली आहे.

6. निसर्ग फ्वॉवर सेंटर यांना बुके खरेदीसाठी रक्कम रुपये 4,800/- खर्चाची नोंद आहे. परंतु सदरची रक्कम संतोष प्रमोद खोंतलांडे यांचे नावे अदा केली आहे.

7. जाहिरात दैनिक जनप्रवाह रुपये 5,000/- खर्च केला आहे. देयकासोबत याबाबत उपप्रमाणक नाही.

8. दैनिक तरुण भारत यांचे देयकामध्ये रुपये 6,234/- खर्च नोंदविला आहे. परंतु देयकासोबत रुपये 3,951/- चे प्रमाणक जोडले आहे.

9. आरोग्य शिबिरासाठी उपस्थितांची यादी व कार्यक्रमाचे फोटो नस्तीसोबत नाहीत.

4.470 प्राथमिक आरोग्य केंद्र, भिलवडीकडील अभिलेख्यामधील अनियमिततेबाबत.

पंचायत समिती पलूस, जिल्हा सांगली सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 5)

पंचायत समिती पलूस यांचे सन 2021-22 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणामध्ये आरोग्य विभागाकडील प्राथमिक आरोग्य केंद्र, भिलवडीकडील अभिलेख्यांची तपासणी केली असता आढळलेल्या अनियमिततांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. प्राथमिक आरोग्य केंद्र, भिलवडीकडील ओपीडी नोंदवहीची तपासणी केली असता दिनांक 01/04/2021 ते 11/03/2022 या कालावधीतील नोंदवही ठेवण्यात आली नाही. दिनांक 12/03/2022 ते 31/03/2022 इतक्याच कालावधीची नोंद ठेवलेली आहे. तसेच दिनांक 12/03/2022 ते 31/03/2022 या कालावधीमध्ये नोंदवहीनुसार 742 रुग्णांनी तपासणी केल्याचे आढळून येते. त्यामधील 85 लोकांची मोफत तपासणी व 16 आरोपींची तपासणी केल्याचे आढळून आले, असे एकूण 101 रुग्ण वजा जाता 641 रुग्णांचे प्रतिरुग्ण 5/- रुपये प्रमाणे 3,205/- इतक्या रक्कमेचा भरणा केल्याचे आढळून आले नाही. सबब सदर रकमेचा अपहार झालेची शक्यता नाकारता येत नाही. तसेच दिनांक 01/04/2021 ते 11/03/2022 या कालावधीमधील जमा सेवाशुल्कचा भरणा केल्याचे आढळून आले नाही. सदर कालावधीमध्ये किती रुग्णांची तपासणी झाली? तसेच त्यांचेकडून किती रक्कम जमा झाली याबाबत लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही. सबब सदर कालावधीमधील जमा झालेल्या सेवा शुल्क रक्कमेचा अपहार झालेची शक्यता नाकारता येत नाही.

2. दिनांक 01/04/2021 ते 27/04/2021 मध्ये जमा झालेल्या तपासणी फी ची रक्कम रुपये 812/- चा भरणा दिनांक 28/04/2021 रोजी केल्याचे चलन उपलब्ध झाले तसेच दिनांक 01/05/2021 ते 06/07/2021

मध्ये जमा झालेल्या तपासणी फी ची रक्कम रुपये 1,670/- चा भरणा दिनांक 08/10/2021 रोजी केल्याचे चलन उपलब्ध झाले. परंतु सदर कालावधीमधील ओपीडी नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध न झालेने जमा रक्कमेचा व भरणा केलेल्या रक्कमेचा ताळमेळ घेता आला नाही. तसेच दिनांक 07/07/2021 ते 31/03/2022 ह्या कालावधीमधील सेवा शुल्क रक्कम भरणा केल्याची चलने उपलब्ध झाली नाहीत.

3. मुदतबाह्य औषध साठा नोंदवहीमध्ये सन 2012-13 ते 2021-22 या कालावधीमधील मुदतबाह्य औषधांची नोंद घेणेत आली नाही.

4. औषध साठा नोंदवहीची (नमुना नंबर 33) तपासणी केली असता सदर नोंदवही अपूर्ण असल्याचे आढळून आले. प्राप्त झालेली औषधांचे दिलेल्या/विकलेल्या वस्तूंची संख्या/ परिमाण ह्या स्तंभामधील नोंदी घेण्यात आल्या नाहीत.

4.471 प्राथमिक आरोग्य केंद्र भिलवडीमधील निवासस्थान वाटप केलेल्या कर्मचारी यांना घरभाडे भत्ता अदा केलेबाबत.

पंचायत समिती पलूस, जिल्हा सांगली सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 20)

पंचायत समिती पलूस यांचे सन 2021-22 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र भिलवडीचे वेतन देयकांची तपासणी केली असता निवासस्थान वाटप केलेल्या कर्मचारी यांना घरभाडे भत्ता अदा केल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

प्राथमिक आरोग्य केंद्र, भिलवडीमध्ये औषध निर्माण अधिकारी, आरोग्य सहाय्यक (पुरुष), आरोग्य सहाय्यक (महिला), आरोग्य सेवक (महिला) या कर्मचाऱ्यांना वापराकरिता एकूण 4 निवासस्थान उपलब्ध आहेत. पैकी आरोग्य निर्माण अधिकारी आणि आरोग्य सेवक (महिला) ही पदे रिक्त आहेत. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रमध्ये आरोग्य सहाय्यक (पुरुष) या पदावर श्री.एस.एच.ननावरे यांची दिनांक 15/01/2018 रोजी नियुक्ती झाले आहे. तसेच आरोग्य सहाय्यक (महिला) या पदावर श्रीमती एन.के.हवालदार यांची दिनांक 09/08/2021 रोजी नियुक्ती झाली आहे. दोन्ही कर्मचाऱ्यांना वापराकरिता निवासस्थान उपलब्ध आहे.

ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-1089/सीआर 3652/पंरा-7 यांचे दिनांक 04 फेब्रुवारी 2005 मधील अनुक्रमांक 22 अन्वये निवासस्थान वाटप केलेल्या कर्मचाऱ्यांना/अधिकाऱ्यांना घरभाडे भत्ता अनुज्ञेय नाही. त्यामुळे जिल्हा परिषदांच्या अशा कर्मचारी/ अधिकारी यांचे मासिक वेतनातून घरभाडे भत्ता अनुज्ञेय ठरत नाही. असे निर्देश असताना उपरोक्त दोन्ही कर्मचाऱ्यांना वेतनामध्ये घरभाडे भत्ता अदा केला असल्याने जादा अदा वेतनाची परिगणना करुन सदर रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

4.472 कोव्हीड 19 अंतर्गत झालेल्या खर्चाबाबत.

पंचायत समिती शिरोळ, जिल्हा कोल्हापूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 18)

पंचायत समिती शिरोळ ने सन 2021-22 मध्ये जिल्हा परिषद स्वनिधीमधून कोव्हीड अंतर्गत रक्कम रुपये 9,61,512/- खर्च केला आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. आयुक्त पूणे विभाग यांचे पत्र दिनांक 03/01/2022 मधील अटी वा शर्तीनुसार अन्न व औषध प्रशासन विभागाचे साहित्य, ऑक्सीजन सिलेंडर, सर्व मेडीकल उत्पादन यांचे चाचणी अहवाल नस्तीसोबत नाही.

2. तालुक्यात 30 कोव्हीड सेंटर होती. सदर कोव्हीड सेंटरची साहित्य खरेदीची मागणी, वाटप, शिल्लक साहित्य इत्यादी नस्ती सोबत नाही.

3. खरेदीबाबतची delivery चलने नसल्याने औषधे प्राप्त झाल्याबाबत पडताळणी करता येत नाही.

4. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्रक्र82/भाग-III/उदयोग-4 दिनांक 1 डिसेंबर 2016 मधील प्रकरण 2.9.4 अन्वये स्थानिक खरेदी समिती न नेमताच खरेदी केली आहे.

5. औषध खरेदी करण्या अगोदर सदर औषधांची उपलब्ध साठा आणि आवश्यक मागणी याबाबतीत आवश्यक कोणतीही माहिती घेण्यात आली नाही. नस्तीत याबाबत कोणतेही लेखे उपलब्ध नाही.

6. वस्तू व सेवाकर अधिनियमातील कलम 51 अन्वये 2 टक्के TDS रक्कम रुपये 19,230/- कपात करणे बंधनकारक असताना तशी कार्यवाही केली नाही.

4.473 कोव्हीड सेंटरसाठी जंबो व वॉर्ड सिलेंडर रिफीलींग व सिस्टीम देखभाल व दुरुस्ती.

पंचायत समिती शाहुवाडी, जिल्हा कोल्हापूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 13)

पंचायत समिती शाहुवाडी यांनी सन 2021-22 मध्ये कोव्हीड सेंटरसाठी जंबो व वॉर्ड सिलेंडर रिफीलींग व सिस्टीम देखभाल व दुरुस्तीवर एकूण रुपये 12,11,339/- खर्च केला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. केंद्रीय वस्तु व सेवा कर अधिनियम 2017 चे कलम 51, महाराष्ट्र वस्तु व सेवा कर अधिनियम 2017 व वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-2018/प्र.क्र.144/2018/कोषा-प्रशा-5 दिनांक 28 सप्टेंबर 2018 नुसार दिनांक 01 ऑक्टोबर 2018 पासून साहित्य खरेदीमधील संविदेचे मूल्य रुपये 2.5 लाखांच्या वर असल्यास खरेदीमध्ये 2 टक्के जीएसटी/टीडीएस कपात केली नसल्यामुळे रुपये 12,11,339/- वर 2 टक्के दराने रक्कम रुपये 24,226/- संबंधीत ई लाईट सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस यांच्याकडून वसूल करणे आवश्यक आहे.

2. आयकर अधिनियम 1961 कलम 194 सी नुसार दिनांक 01/07/2010 पासून ठेकेदार व उप ठेकेदारास प्रदान रुपये 30,000/- व वार्षिक प्रदान रुपये 75,000/- असेल तेव्हा 2 टक्के संस्थात्मक व 1 टक्के वैयक्तीक प्रमाणे आयकर कपात करणे बंधनकारक आहे. त्यानुसार रक्कम रुपये 12,11,339/- वर 2 टक्के दराने रुपये 24,226/- संबंधीत ई लाईट सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस यांच्याकडून वसूल करणे आवश्यक आहे.

4.474 कोरोना काळजी केंद्रा मधील रुग्णांकरीता ऑक्सीजन सिलेंडर पुरवठा देयकामधील अनियमिततेबाबत.

पंचायत समिती हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 7)

पंचायत समिती हातकणंगले यांनी सन 2021-22 मध्ये आरोग्य विभागाकडील कोरोना काळातील कोव्हीड सेंटर करीता ऑक्सीजन सिलेंडर पुरवठा संदर्भात हस्तांतरण निधीतून रक्कम रुपये 13,17,809/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखसं-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दिनांक 01 डिसेंबर 2016 मधील 4.2 नुसार दरपत्रकाद्वारे वस्तूंची खरेदी करताना खरेदी करण्यात येत असलेल्या वस्तूंचे उत्पादक/प्राधिकृत वितरक/विक्रेते यांचेकडून दरपत्रके मागविणे आवश्यक असता, खरेदी केलेले पुरवठादार या वस्तूचे प्राधिकृत विक्रेते/वितरक असल्याची कोणतीही कागदपत्रे अभिलेख्यामध्ये नाहीत तसेच साहित्याचा ब्रँड वॉरंटी कालावधी समजून येत नाही.

2. उपरोक्त शासन निर्णयातील 3.2.3 नुसार दरपत्रके/निविदाधाकरकडून साहित्याची खरेदी करताना त्यांचा VAT/GST क्रमांक तसेच पॅनकार्ड घेणे आवश्यक असता निविदाधारकाकडून उपरोक्त कागदपत्रे न घेताच थेट खरेदी केली आहे.

3. पुरवठादारास पुरवठा आदेश न देताच साहित्याची खरेदी करण्यात आली आहे.

4. पुरवठा करण्यात आलेल्या ऑक्सीजन सिलेंडर चा परिमाण, दर इत्यादी तपशील उप प्रमाणकावर नोंदवलेला नाही व साठा नोंदवही न ठेवताच रक्कम आदा करण्यात आली आहे.

5. वापर नोंदवही ठेवली नसल्याने, ऑक्सीजन सिलेंडरचा वापर कोठे, कधी व किती प्रमाणात केला याची पडताळणी करता येत नाही.

6. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडील पत्र क्रमांक कोजिप/आरोग्य विभाग/औ.भां/50-5740/2021 दिनांक 01/10/2021 अन्वये ऑक्सीजन पुरवठयाचे दर हे रुपये 25.43 मुळ किंमत (Rate per Cubic meter) आणि रुपये 14.50 हॅन्डलींग चार्जेस (Handling/ Loading /Inspection /Inpurt Charges) यामधील सर्वात कमी दराप्रमाणे देयक अदा करणे संदर्भात सूचीत केलेले असताना पंचायत समितीने पुरवठादाराकडून जास्त दराने ऑक्सीजन पुर्नभरण करुन घेतल्याचे निदर्शनास आले आहे. सदर एकूण रक्कम रुपये 2,17,060/- वसूल करणे आवश्यक आहे.

7. देयकातून GST जादा आकारुन देयकाची रक्कम आदा झाल्याने रक्कम रुपये 10,019/- जादा अदा झालेने सदर रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

4.475 कडगांव प्राथमिक आरोग्य केंद्राकडील सेवा पुस्तकातील उणिवांबाबत

पंचायत समिती गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 14)

पंचायत समिती गडहिंग्लजचे सन 2021-22 चे लेखापरीक्षणामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र कडगांव

कडील कर्मचाऱ्यांच्या निवडक सेवापुस्तकांची पडताळणी केली असता आढळलेल्या त्रूटींबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. श्रीमती रुपाली तोडकर यांचे सेवापुस्तक पडताळणी करता त्यांचे दिनांक 01/07/2010 रोजीची वेतनवाढ चुकीची झालेली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, यांचेकडील आदेश क्रमांक कोजिप/आरोग्य/कक्ष-1/3313 ते 3332/2018 दिनांक 15/10/2018 अन्वये त्यांना सुधारीत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देवून लाभाची वेतन निश्चिती करीत असताना चुकीच्या वेतन वाढीची काल्पनिकरित्या दुरुस्ती करुन आश्वासित प्रगती योजनेची वेतन निश्चिती केलेचे दिसून आले. तसेच दिनांक 01.01.2016 रोजीची 7 व्या वेतन आयोगाची केलेली वेतन निश्चिती देखील चुकीच्या वेतनवाढीची काल्पनिकरित्या दुरुस्ती करुन गृहीत धरलेल्या वेतनावरुन केलेचे दिसून येते. सुधारीत आश्वासित प्रगती योजनेनुसार कालबद्ध पदोन्नतीच्या लाभाची 7 व्या वेतन आयोगातील सुधारीत वेतन निश्चिती न करताच दिनांक 01.07.2019 पासून वेतन आहरीत करणेत येत आहे. चुकीच्या वेतन निश्चितीची फेर वेतन निश्चिती करुन घेणेची कार्यवाही केली नाही. वसूली न करताच वेतन निश्चिती केली आहे.

श्रीमती रुपाली तोडकर या दिनांक 05.01.2006 रोजी शासकीय सेवेत दोन वर्षाच्या बंधपत्रीत कालावधीसाठी रुजू झाल्या आहेत. दिनांक 03.01.2008 पासून त्यांना नियमित केले आहे. तथापि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडील आदेश क्रमांक जिपको/आरोग्य/कक्ष/2359 ते 2586 दिनांक 09.12.2009 अन्वये श्रीमती तोडकर यांचा बंधपत्रीत कालावधी नियमित केल्याने त्यांची वेतन निश्चिती केली आहे. मात्र सदर वेतन निश्चितीमध्ये दिनांक 01/07/2010 ची वेतनवाढ चुकीची झाली असून ती 01/07/2018 पर्यंत चुकलेली आहे. मात्र दिनांक 01.01.2016 रोजीची 7 व्या वेतन आयोगाची केलेली वेतन निश्चिती देखील चुकीच्या वेतनवाढीची काल्पनिकरित्या दुरुस्ती करुन गृहीत धरलेल्या वेतनावरुन केली आहे.

2. मुळ परिच्छेदाचे तपशीलात नमूद 5 कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकाची पडताळणी केली असता त्यामध्ये लेखापरीक्षण कालावधीतील वेतनवाढीच्या नोंदी नसणे, वेतनवाढीवर कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी नसणे, शैक्षणिक पात्रतेच्या नोंदी प्रमाणित नसणे, हिंदी / मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण अथवा सुटबाबत नोंदी नसणे इत्यादी उणीवा निदर्शनास आल्या.

4.476 प्राथमिक आरोग्य केंद्र विचोरी येथील अभिलेख्याबाबत.

पंचायत समिती मोर्शी, जिल्हा अमरावती, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 20)

पंचायत समिती मोर्शी यांचे सन 2021-22 चे लेखापरीक्षणामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र विचोरी यांनी ठेवलेल्या वित्तीय अभिलेख्यांची तपासणी केली असता आढळलेल्या अनियमिततांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. रोख वहीची तपासणी केली असता रोख वहीत कोणतेच व्यवहार केल्याचे दिसून येत नाही. सर्व देयके ही ऑनलाईन असल्याने ऑफलाईन रोख पुस्तिकेत सुध्दा नोंदी घेणे आवश्यक आहे. परंतू अशा नोंदी केल्याचे दिसून आले नाही.

2. कनिष्ठ लिपीक हे रोखपालाचे काम सांभाळत असल्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 42(1) नुसार बंधपत्र घेणे आवश्यक असताना बंधपत्र घेण्यात आले नाही.

3. मंजुर पदानुसार भरलेली पदे व रिक्त पदे किती आहेत याचा मंजुर आकृतीबंधानुसार ताळमेळ घेतला नाही.

4. प्राथमिक आरोग्य केंद्र विचोरी, येथे मंजुर आकृतीबंधानुसार असलेल्या पदाप्रमाणे वेतन अदा करण्यात येत असल्याबाबत एस.एस.ओ. रजिस्टर नमुना नंबर एपीपी-2 ठेवण्यात आले नाही.

5. प्राथमिक आरोग्य केंद्राकडे एकूण रुपये 1,66,885/- चे एक वर्षावरील 22 अरोखीकृत धनादेश आहेत. त्या रकमा कोणाच्या आहेत. याबाबत शहानिशा करुन सदर धनादेश रद्द करुन रोख पुस्तकेच्या जमा बाजुला नोंदी घेणे आवश्यक आहे.

4.477 पंचायत समिती धारणी येथील आरोग्य विभागातील मानव विकास योजना निधी मातृत्व अनुदान बुडीत मजुरी व इतर खर्चाची देयके प्रदानाबाबत.

पंचायत समिती धारणी, जिल्हा अमरावती सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 2)

पंचायत समिती धारणी यांनी सन 2021-22 मध्ये आरोग्य विभाग अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मातृत्व अनुदान बुडीत मजुरी व इतर साहित्य खरेदी योजनेवर एकूण रक्कम रुपये 8,32,641/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. सदर योजने अंतर्गत सुविधा या बालके/माता/काळजी वाहकास आधार लिंक द्वारे पुरविणेबाबत शासनाचे निर्देश आहेत. नस्ती व मुळ प्रमाणकामध्ये संबंधीताला रक्कम प्रदान केल्याबाबत Paid by me असे नमुद असुन त्याखाली प्राथमिक आरोग्य केंद्र वैद्यकिय अधिकारी यांची स्वाक्षरी आहे. त्यामुळे सदर रक्कम संबंधीताच्या बँक खात्यात जमा न करता प्रत्यक्ष दिल्याचे आढळते. संबंधिताची पोच पावती घेण्यात आली नाही.

2. योजनेंतर्गत C.T.C. करीता किराणा सामान, औषधी व इतर साहित्य खरेदी केल्याबाबत उपप्रमाणकावरुन आढळते याकरीता कमीत कमी तिन दरपत्रके मागवुन तुलनात्मक तक्ताच्या आधारे कमी दराची निविदा मंजुर केली नाही.

3. C.T.C. अंतर्गत साहित्य खरेदी केलेल्या दुकानदाराचे GST क्रमांक बिलावर नमुद नाहीत. त्यामुळे अधिकृत साहित्य खरेदी केल्याचे दिसून येत नाही.

4.478 प्राथमिक आरोग्य केंद्रांचे लेख्यामधील अनियमितता.

पंचायत समिती अचलपूर, जिल्हा अमरावती, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 14)

पंचायत समिती अचलपूरचे सन 2021-22 चे लेखापरीक्षणामध्ये तालुका आरोग्य अधिकारी तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र पीट, येसुर्णा, धामणगाव गढी येथील निवडक महीन्याचे लेख्यांची तपासणी केली असता आढळलेल्या अनियमिततांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 57 प्रमाणे नमुना 7 मध्ये दैनिकपणे आलेल्या आर्थिक व्यवहाराचे लेखे रोखपुस्तकादवारे अद्ययावत करुन गोषवारे काढले नाहीत.

2. प्राथमिक आरोग्य केंद्रामधील आकृतीबंधानुसार मान्य पदांबाबत अधिकृत सक्षम अधिकाऱ्याचे आदेश लेखापरिक्षणास सादर केले नाही. तसेच सदर वेतन देयका सोबतसुदधा अधिकृत पदाच्या संख्येबाबत माहिती नसल्यामुळे आकृतीबंधानुसार वेतन प्रदानाबाबत पडताळणी करता आली नाही.

3. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 43 (1) नुसार संबंधीत कर्मचारी आस्थापनेच्या कामासह रोखपालाचे काम सांभाळत असल्याने वैदयकीय अधिकारी यांनी उचित बंधपत्र घेतले नाही.

4. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 13 व 49 अन्वये वसुल केलेल्या रक्कमेचा भरणा जिल्हा निधीत विहीत कालावधीत करणे आवश्यक असताना सन 2021-22 मधे ओ.पी.डी. द्वारे प्राप्त रक्कम ही रुग्ण कल्याण समितीचे खात्यामधे जमा केली आहे व सदर रक्कम या खात्यामधून खर्च करण्यात येते. याबाबत वसुल रक्कम रुग्ण कल्याण समितीमध्ये जमा केली याबाबत कोणतेही आदेश पत्र लेखापरिक्षणास उपलब्ध करून केले नाही.

5. कर्मचाऱ्यांचे वेतनाची नोंदवही ठेवण्यात आली नाही.

6. प्राथमिक आरोग्य केंद्र, धामणगाव गढ़ी चे साठा नोंदवही, औषधी नोंदवही, आयकर विवरणपत्रे व संबंधीत अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत. सदर अभिलेखे वारंवार तोडी तसेच अर्धसमास पत्रांद्वारे लेखी सुचना देऊन सुद्धा सादर न केल्याने त्यावर झालेला खर्च व आयकर योग्य असल्याचे प्रमाणित करता आले नाही.

4.479 वैद्यकीय प्रतिपुर्ती देयकातील अनियमिततेबाबत.

पंचायत समिती देऊळगाव राजा, जिल्हा बुलढाणा सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 12)

पंचायत समिती देऊळगाव राजा यांचे सन 2021-22 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणामध्ये निवड महीन्यातील वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकांची पडताळणी केली असता आढळलेल्या अनियमिततांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. प्रमाणक क्रमांक 268 दिनांक 31.03.2022 नुसार श्री. भानुदास दगडू मान्टे, ग्रामविकास अधिकारी यांना रुपये 67,817/- वैद्यकीय प्रतिपूर्तीचे प्रदान केले आहे. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक एमएजी-1099/प्र.क्र.240/99 आरोग्य-3 दिनांक 30 ऑगष्ट 1999 व दिनांक 16.11.2011 नुसार बेड चार्ज 9 दिवस रुपये 600/- प्रमाणे 5,400/- दिला. परंतु हॉस्पिटल मध्ये भरती कालावधीसाठी ICU सोडून 75 टक्के देय आहे. याप्रमाणे अनुज्ञेय रुपये 4,050/- देय असताना देयकामध्ये रुपये 5,400/- दिल्याने रुपये 1350/- चे जादा प्रदान झाले.

2. प्रमाणक क्रमांक 278 दिनांक 31.03.2022 नुसार श्री सुशांताषा शामराव सावदेकर, त्यांचे पत्नीचे प्रसुती रजेच्या आजारासाठी रुपये 31,128/- इतक्या रक्केमेचे वैद्यकीय प्रतिपूर्तीचे प्रदान केले आहे. यामध्ये अ) सार्वजनीक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक एमएजी/1090/693/आरोग्य-9 दिनांक 31 मे 1991 व शासन निर्णय क्रमांक एमसी/1099/प्रक्र.237 आरोग्य-3 दिनांक 21 ऑगष्ट 1999 नुसार कर्मचारी अथवा कर्मचाऱ्याची पत्नी यांना प्रसुतीपुर्वी शासकीय रुग्णालयात गर्भधारणेनंतर पहिल्या 2 ते 3 महिन्यात नाव नोंदविणे अनिवार्य आहे अशाप्रकारे नाव नोंदणी केली नसल्यास प्रसुतीच्या वेळी आकस्मिक परिस्थिती निर्माण झाल्यास खाजगी रुग्णालयात औषधोपचार घेतल्यावर त्यावरील खर्चाची वैद्यकीय प्रतिपुर्ती अनुज्ञेय नाही, असे स्पष्ट निर्देश असताना शासकीय रुग्णालयात नोंदणी केली नसल्याने उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे खाजगी रुग्णालयात केलेल्या औषधोपचाराची प्रतिपूर्तीची रक्कम रुपये 31,128/- लेखापरीक्षणास मान्य नसल्याने याची संबंधितावर जबाबदारी निश्चित व वसुली करुन शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

ब) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन परिपत्रक क्रमांक एमएजी-1091/1023/सीआर-82, दिनांक 7 जुन 1991 नुसार संबंधीत कर्मचाऱ्याने उपचार घेतलेल्या शेवटच्या दिनांकानंतर एक वर्षाचे आत परिपूर्ण देयक कार्यालयास सादर न केल्यास त्याने केलेल्या वैद्यकीय प्रतिपूर्ती अनुज्ञेय ठरत नाही. श्री. सावदेकर यांची पत्नी दिनांक 14.11.2019 ते 27.11.2019 या कालावधीत खाजगी रुग्णालयात भरती असताना देयक दिनांक 08.12.2020 रोजी सादर केल्याने सदर मागणी देय ठरत नसताना रुपये 31,128/- चे नियमबाह्य प्रदान केले.

3. प्रमाणक क्रमांक 279 दिनांक 31.03.2022 नुसार श्री. रविंद्र बाबुराव घुगे यांचे पत्नीचे वडील बाबुराव घुगे आजारासाठी रुपये 1,28,183/- रक्केमेचे वैद्यकीय प्रतिपूर्तीचे प्रदान केले आहे. यामध्ये दिनांक 10.07.2020 ते 18.07.2020 या कालावधीत संतकृपा हॉस्पिटल, जालना येथे उपचार केल्याबाबत रुपये 39,745/- व दिनांक 18.07.2020 ते 21.07.2020 या कालावधीत शंकर चेस्ट हॉस्पिटल, औरंगाबाद येथे उपचारासाठी रुपये 39,975/- असे एकुण रुपये 79,720/- चे प्रदान केले आहे. नियमबाह्य प्रदान झाले असल्याने याची वसुली करणे आवश्यक आहे.

4. प्रमाणक क्रमांक 280 दिनांक 31.03.2022 नुसार श्री. संजीव अर्जुन नागरे यांना मुलीचे आजारासाठी रुपये 1,52,505/- इतक्या रक्केमेचे वैद्यकीय प्रतिपूर्तीचे प्रदान केले आहे. यामध्ये दिनांक 15.08.2020 ते 22.08.2020 या कालावधीत जालना हॉस्पिटल, जालना येथे भरती रुपये 70,305/- ची बिलाची पडताळणी केली असता कन्सटंन चार्ज रुपये 14,000/- लावला असताना पुन्हा दुबार कन्सटंट व्हीजीट रुपये 7,000/- तसेच स्वत: दिनांक 18.08.2020 ते 22.08.2020 या कालावधीत जालना हॉस्पिटल, जालना येथे भरती रुपये 70,305/- ची बीलाची पडताळणी केली असता कन्सटंन चार्ज रुपये 14,000/- लावला असताना पुन्हा दुबार कन्सटंट व्हीजीट रुपये 7,000/- जादा लावल्याने श्री नागरे यांचेवर एकुण रुपये 14,000/- ची वसुली करणे आवश्यक आहे.

5. प्रमाणक क्रमांक 281 दिनांक 31.03.2022 नुसार श्री. शिवहरी भिमराव कांयदे यांना रुपये 1,53,645/- इतक्या रक्केमेचे वैद्यकीय प्रतिपूर्तीचे प्रदान केले आहे. यामध्ये अ) संत गाडगेबाबा हॉस्पीटल, देवुळगाव राजा चे बील क्रमांक 50 दिनांक 21.01.2021 मध्ये PPE kit रुपये 5,000/- चार्ज लावला आहे. शासन निर्णय क्रमांक एमएजी-2005/प्र.क्र.1/ आरोग्य दिनांक 11 मार्च 2005 नुसार औषधोपचाराच्या प्रत्यक्ष खर्चाच्या 90 टक्के प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील. परंतु साहित्यासाठी वैद्यकीय प्रतिपूर्ती अनुज्ञेय ठरत नाही. त्यामुळे सदर रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

ब) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक एमएजी-1099/प्र.क्र.240/99/आरोग्य-3 दिनांक 30 ऑगष्ट 1999 व दिनांक 16.11.2011 नुसार विलगीकरण कक्षासाठी 4 दिवस रुपये 4,000/- प्रमाणे

16,000/- प्रदान केले. पंरतु हॉस्पीटल मध्ये भरती कालावधीसाठी ICU सोडून 75 टक्के देय आहे. रुपये 12,000/- अनुज्ञेय असताना देयकामध्ये रुपये 16,000/- दिल्याने रुपये 4,000/- चे जादा प्रदान झाले आहे.

क) निदान पॅथॅलॉजी रुपये 11,200/- व 750/- व सहयाद्री सेन्टर रुपये 4,000/- असे एकुण रुपये 15,950/- प्रतिपूर्ती देण्यात आली. परंतु तपासणी अहवाल जोडले नसल्याने याची वसुली करणे आवश्यक आहे.

6. प्रमाणक क्रमांक 284 दिनांक 31.03.2022 नुसार श्री. गजानन रामकृष्ण नागरे यांना त्यांचे आईचे आजारासाठी रुपये 2,41,475/- इतक्या रकमेचे वैद्यकीय प्रतिपूर्तीचे प्रदान केले आहे. यामध्ये अ) संत गाडगेबाबा हॉस्पीटल, देवुळगाव राजाचे बील क्रमांक 45 दिनांक 30.09.2020 मध्ये PPE kit रुपये 10,000/- चार्ज लावला आहे. शासन निर्णय क्रमांक एमएजी 2005/प्र.क्र.1/आरोग्य दिनांक 11 मार्च 2005 नुसार औषधोपचाराच्या प्रत्यक्ष खर्चाच्या 90 टक्के प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील. परंतु साहित्यासाठी वैद्यकीय प्रतिपूर्ती अनुज्ञेय नाही. त्यामुळे सदर रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

ब) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे देयक मंजुरी आदेश क्रमांक 3363 दिनांक 13.08.2021 नुसार रुपये 10,000/- नादेय रक्कम असताना देयकातुन वसुली केली नसल्याने रुपये 10,000/- चे जादा प्रदान झाले.

7. प्रमाणक क्रमांक 291 दिनांक 31.03.2022 नुसार रुपये 57,250/- इतक्या रकमेचे श्रीमती. अस्मिता भास्करराव मदन यांच्या दिनांक 03.08.2020 ते 08.08.2020 या कालावधीतील बिल हे मोघम आहे. म्हणजे किती दिवस, प्रती रोज, व्हीजीट फी किती या बाबत कोणताही उल्लेख नाही. बिलामध्ये बेड चार्जेस रुपये 7,500/- लावला असताना दुबार पुन्हा वार्ड चार्ज रुपये 4,475/- अतिरिक्त लावल्याने याची वसुली करणे आवश्यक आहे.

8. प्रमाणक क्रमांक 292 दिनांक 31.03.2022 नुसार रुपये 2,64,378/- इतक्या रकमेचे श्री. परमेश्वर देशमुख यांच्या पत्नीचे दिनांक 08.12.2020 ते 12.12.2020 या कालावधीतील एक्स व्हीजन रुपये 17,300/- व गामा व्हीजन रुपये 5,000/- असे एकुण रुपये 22,300/- प्रतिपूर्ती दिली आहे. परंतु तपासणी अहवाल नसल्याने याची वसुली करणे आवश्यक आहे.

9. प्रमाणक क्रमांक 294 दिनांक 31.03.2022 नुसार श्री. अमोल खुशालराव पवार यांन रुपये 23,079/- इतक्या रक्केमेचे प्रदान केले आहे. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक एमएजी-2005/9/प्र.क्र.1/आरोग्य-3 दिनांक 19 मार्च 2005 चे परिशिष्ट अ शासन विनिर्दिष्ठ 27 आकस्मिक व 5 गंभीर आजारांच्या यादी मध्ये मुळव्याध या आजाराचा समावेश नसल्याने खाजगी रुग्णालयातील खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय नसताना नियमबाह्यपणे सदर आजार हा अति रक्तस्त्राव यामध्ये समावेश करुन दिशाभुल करुन प्रतिपूर्ती घेतल्याने याची संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन रुपये 23,079/- ची वसुली करुन शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

4.480 प्राथमिक आरोग्य केंद्र मनसरचे अभिलेखे लेखा परीक्षणास सादर न करणेबाबत.

पंचायत समिती रामटेक, जिल्हा नागपूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 4)

पंचायत समिती रामटेक चे सन 2021-22 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणा वेळी प्राथमिक आरोग्य केंद्र मनसर चे अभिलेखे लेखापरीक्षणास सादर केले नाही. याबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय आहे.

1. दोन अर्धसमास पत्रांन्वये प्राथमिक आरोग्य केंद्र मनसरचे अभिलेखे लेखापरीक्षणास सादर करण्याबाबत सूचित करुनही अभिलेखे सादर केले नाही. या अनुषंगाने सन 2020-21 च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये परिच्छेद क्रमांक 14 आहे, याची जाणीव करून देण्यात आली. तरीही अभिलेखे लेखापरीक्षणास सादर केले नाही व अर्धसमास पत्राचे उत्तरही दिले नाही.

2. प्राथमिक आरोग्य केंद्र, मनसरने सन 2021-22 मध्ये अभिकरण रुपये 29,37,123/-, जिल्हा परिषद सेस रुपये 69,498/- व जिल्हा निधी रुपये 1,17,73,515/- असा एकूण रक्कम रुपये 1,47,80,136/- खर्च नोंदविला आहे. परंतु अभिलेखे सादर न केल्यामुळे तपासणी करता आली नाही. त्यामुळे लेखापरीक्षणास सदरचा खर्च मान्य करता येत नाही.

4.481 प्राथमिक आरोग्य केंद्र जिमलगट्टा येथील बाह्यरुग्ण शुल्क जमा व भरणा करणेबाबत तसेच किरकोळ रोकड वहीतील अनियमितता.

पंचायत समिती अहेरी, जिल्हा गडचिरोली, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 7)

पंचायत समिती अहेरी चे सन 2021-22 या आर्थीक वर्षाचे लेखापरीक्षणादरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्र जिमलगट्टा येथील बाह्यरुग्ण शुल्क जमा व भरणा करणेबाबत अभिलेखे तसेच किरकोळ रोकडवही तपासली असता आढळलेल्या अनियमिततांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. बाह्यरुग्ण शुल्क रुपये 5/- प्रती रुग्णप्रमाणे जमा करण्यात येत असुन त्यापैकी रुपये 2/- जिल्हा निधीत व रुपये 3/- रुग्णकल्याण समितीच्या खात्यात भरणा करण्यात येते. त्यानुसार सन 2021-22 मध्ये जमा झालेल्या एकुण बाह्यरुग्ण शुल्क रक्कम रुपये 20,925/- पैकी रुपये 8,370/- जिल्हा निधीत जमा करणे आवश्यक असताना फक्त रुपये 1,074/- जिल्हा निधीत जमा केल्याचे दिसुन आले. रुग्णकल्याण समितीच्या खात्यात सुध्दा रक्कम जमा केल्याचे दिसून आले नाही.

2. जमा बाह्यरुग्ण शुल्क रुपये 20,925/- पैकी रुपये 10,872/- परस्पर कोणत्याही सक्षम अधिकाऱ्याची मंजुरी न घेता कार्यालयीन स्टेशनरी, साहित्य खरेदी व झेरॉक्स काढणे करीता खर्च केली आहे.

3. उपरोक्त प्रमाणे खर्च केलेल्या रक्कम रुपये 10,872/- मधुन खरेदी केलेले साहित्य साठा पुस्तकात नोंदवून त्यानंतर वापरणे आवश्यक आहे. परंतु साठापुस्तक ठेवण्यात आले नाही.

4. भरारी पथका करीता भाडे तत्वावरील वाहनांचे मासिक देयके (निव्वळ रक्कम व आयकर कपातीच्या रकमा) सदर प्राथमिक आरोग्य केंद्रास आहरीत केल्या असून त्यापैकी निव्वळ रकमा संबंधित कंत्राटदारास प्रदान केल्या आहेत. परंतु आयकर कपातीची रक्कम रुपये 11,520/- लेखापरीक्षणाच्या दिनांकापर्यंत शासन खाती जमा केल्याचे व आयकर परतावा फाईल केल्याचे दिसुन आले नाही.

5. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रा अंतर्गत 2 भरारी पथकाकरीता पुरविलेल्या भाड्याचे वाहनावर रुपये 24,000/- प्रति महिना प्रमाणे एका वर्षाकरीता रुपये 5,76,000/- खर्च होत असून वस्तु व सेवा कर कायद्यानुसार रुपये 2.5 लक्ष पेक्षा जादाचे प्रदान असल्याने 2 टक्के GST रुपये 11,520/- वसुल करुन शासन खाती भरणा केले नाही.

4.482 आरोग्य विभागातील भरारी पथक वाहन भाडे रक्कम प्रदानातील अनियमिततेबाबत.

पंचायत समिती धानोरा, जिल्हा गडचिरोली, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 12)

पंचायत समिती धानोरा यांनी सन 2021-22 मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र गोडलवाही, कारवाफा, मुरुमगाव व पेंढरी अंतर्गत येणारे उपकेंद्रांकरीता भरारी पथक वाहनाचे भाडे प्रदानापोटी रुपये 23,76,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम 2017 व केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम, 2017 च्या कलम 31 नियम 46 नुसार पुरवठादाराची देयके वस्तु व सेवा करासहित सादर करणे आवश्यक असताना खर्चाचे देयके वस्तू व सेवा कर न लावता सादर केली आहेत.

2. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-2018/प्र.क्र.144/2018/कोषा.प्रशा.5 दिनांक 28-09-2018 नुसार सेवा पुरवठादाराचे देयकामधुन TDS स्वरुपात 2 टक्के GST कपात करणे आवश्यक असताना कपात केल्याचे दिसून आले नाही.

3. आयकर अधिनियम 1961 कलम क्रमांक 203 आणि आयकर नियमावली 1962 मधील नियम 31(1)(ब) नुसार कंत्राटदारांच्या देयकामधून वजावट केलेला आयकर शासन खाती भरणा केल्याचे चलन व आयकर संबंधित फॉर्म नंबर 16-ए बाबतचा तिमाही अहवाल नस्तीस दिसून आले नाही.

4. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांचे कार्यादेशातील अट क्रमांक 2 नुसार वाहनांचे तांत्रिक तपासणी करीता गठित समितीकडुन वाहन तांत्रिक दृष्टया योग्य असल्याचे प्रमाणित करुन घेतले नाही.

5. कार्यादेशातील अट क्रमांक 11 नुसार नमुद केलेले दर दिनांक 30/09/2021 पर्यंत लागु असल्याचे नमुद आहे. परंतु कार्यादेशास मुदतवाढ न घेता ऑक्टोबर 2021 व त्यापुढील महिन्यांची देयके प्रदान केल्याचे दिसुन येते.

4.483 प्राथमिक आरोग्य केंद्र सिरसम बु. अंतर्गत केलेल्या आकस्मिक खर्चाच्या देयकाबाबत. पंचायत समिती हिंगोली, जिल्हा हिंगोली, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 13)

पंचायत समिती हिंगोली यांचे सन 2021-22 च्या लेखापरीक्षणात अधिनस्त प्राथमिक आरोग्य केंद्र सिरसम बु. अंतर्गत आकस्मिक खर्चाचे देयकाअन्वये रक्कम रुपये 46,341/- खर्च केला आहे. याबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय आहे.

देयकातील उपप्रमाणके तपासली असता त्यामध्ये पावती क्रमांक 1453, 1455, 4707 व 4941 या देयकात दुबार नोंदविल्या गेल्याने एकूण रक्कम रुपये 17,790/- चे जादा प्रदान झालेले आहे. सदर रक्कम वसूल करुन शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

*****